डॉ. संतोष रावसाहेब देशमुख
एम. डी. आयुर्वेद, मुंबई

# अम्लपित्त (Hyperacidity) पथ्य

**चिकित्सा सूत्र :**

ऊर्ध्वं देहस्थिते वान्त्याअप्यधःस्थं रेचनैहरेत्।
पाचनं तिक्तबहलं पथ्यम् च परिकल्पयेत्।" (यो. र)

**नाष्टा:** (खालीलपैकी नाष्ट्याला एक पदार्थ खावा)

- दुग्धाहार - गायीचे दूध ,सुंठ/वेलची सिद्ध आल्याचा चहा अर्धा-अर्धा कप चालेल
- फलाहार - डाळिंब, आवळा, कोहळा, अंजीर, पेठा, नारळ, कवठ, काळ्या मनुका,
- युष/सूप - मूग याचे सुंठ, धने जिरे व तुपाची फोडणी दिलेले सूप किंवा फळभाज्या, पालेभाज्यांचे सूप किंवा भाताची पेज.
- लघ्वाहार - रव्याचा उपमा शिरा/ भाजलेले पोहे, जुना मोरावळा खावा.

**जेवण :**

- फळभाज्या - सर्व चालतील(बटाटा, टोमॅटो, शिमला मीरची, भरताचे वांगे, रताळी सोडून)
- पालेभाज्या -शेवगा, चावळाई (तांदुळजा)
- धान्य - गव्हाचे फुलके ज्वारी/नाचणी/सातू तांदूळ यांची भाकरी, जुनी तांबडी साळ,
- भात - जुन्या तांदळाचा भाजून केलेला भात/मुगाची खिचडी/दूध +बिनमिठाचा भात.
- कढण/ सूप - वर वर्णन केल्याले घ्यावे.
- मांसाहार -कोंबडीचे सूप, बोकडीच्या पायाचे सूप.

- दुधाचे पदार्थ - लोणी, तूप, दुग्धाहार श्रेष्ठ.
- संस्कारित जल - उष्णोदक(सकाळी गरम केलेले पाणी), काळे मनुके धणे/ सब्जा/ नारळाचे पाणी, साळीच्या लाह्याचे पाणी.
- इतर - सुंठ, ओली हळद, शिंगाडा
- **हिरव्या मिरच्या अजिबात वापरू नये.**

**विशिष्ठ पथ्य :**

- दुपारी 12 वाजता व संध्याकाळी 7 वाजता जेवण करावे.
- जेवणासंबंधीचे सामान्य नियम कटाक्षाने पाळावे.
- चित्त प्रसन्न ठेवावे.
- दही ,लोणची,केळी,आंबट फळ तळलेले पदार्थ खाऊ नये.
- उन्हात फिरणे,मैथुन (शरीर संबंध), दिवसा झोपणे व रात्री जागरण टाळावे.
- आंबट तिखट/खारट खाऊ नये.
- यकृत कार्य सुधारण्यासाठी- सुर्योदया समयी पानकोबिचा रस ४ च. + मध १ च. वैद्यकीय सल्ल्याने खावा.

**पंचकर्म :** स्नेहन, वमन, विरेचन, बस्ती, क्षीरबस्ती .
पंचकर्म वैद्यकीय सल्ला व निरीक्षणाखाली करावे.

अधिक माहिती करीता खाली दिलेल्या चिन्हांवर क्लिक करा

सर्व आजारांच्या पथ्य-अपथ्यांची अनुक्रमणिका → index

| क्र. | माधवप्रिया शाखा | संपर्क | पत्ता |
|---|---|---|---|
| १ | घाटकोपर - प्रमुख शाखा | 7045607187 | |
| २ | कांदिवली | 7304751357 | |
| ३ | गिरगाव | 022-22081081 | |
| ४ | पुणे - तिसरा रविवार | 8169507436 | |
| ५ | कोल्हापूर - पहिला रविवार | 7045607187 | |